

आरजीपीपीएलवर २८ जुलै रोजी थेट जप्तीची कारवाई

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

पावसाच्या आगमनाने लांजात भातशेतीच्या कामांना वेग

पान ८




रत्नागिरी ● शनिवार ११ जुलै, २०२६ RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २२ ● अंक २४२ ● पाने ८ ● ₹ ५.०० www.prahaar.in epaper.prahaar.in


# विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफी जाहीर

## शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी मिळणार : ५०हजारांची अट रद्द , ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार लाभ - मुख्यमंत्री

**मुंबई ( प्रतिनिधी) :**



राज्यातील बळीराजासाठी राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक घोषणा केली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना'अंतर्गत शेतकऱ्यांना दिली जाणारी ५० हजार रुपये भरण्याची जाचक अट सरकारने पूर्णपणे काढून टाकली आहे. यामुळे राज्यातील तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी मिळणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावरील विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतकरी हिताला प्राधान्य देत असल्याचे अधोरेखित केले. या निर्णयामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

विरोधकांकडून या कर्जमाफी योजनेवर होत असलेल्या टीकेला फडणवीस यांनी आकडेवारीसह सडेतोड उत्तर दिले. या योजनेमुळे केवळ ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल आणि १२-१३ हजार कोटींचाच लाभ मिळेल, हा दावा पूर्णपणे चुकीचा आहे. राष्ट्रीयकृत, व्यापारी आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून गोळा केलेल्या अचूक डेटानुसार, ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळवून देणारी ऐतिहासिक योजना आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**५० हजारांची अट का काढली?**

कर्जमाफीबाबत अभ्यास करण्यासाठी सरकारने 'प्रवीण परदेशी समिती' स्थापन केली होती. वारंवार कर्जमाफी दिल्यास शेतकरी

(पान २ वर)

### अजित पवारांच्या अपघाताचे सत्य बाहेर आणणारच

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, सीआयडी आणि 'एएआयबी' यंत्रणांकडून दोन प्रकारे तपास सुरू आहे. 'एएआयबी'चा अंतिम अहवाल साधारणतः जानेवारी २०२७ पूर्वी येईल. केंद्र सरकारच्या विनंतीनुसार यात परदेशी तज्ज्ञांची मदत घेतली जात असून, ब्लॅक बॉक्समधील संपूर्ण डेटा डाऊनलोड झाला आहे. पायलट सुमीत कपूर यांच्या बँक खात्यांची, शेअर्सची तपासणी केली असता काहीही संशयास्पद आढळलेले नाही. दादांच्या पुण्यतिथीपूर्वी हा अहवाल येईल आणि त्यातील सत्य बाहेर आल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

### 'भाडे के टट्टू'वर आक्षेप घेणारे 'सुपारीबाज'

पायाभूत सुविधांच्या कामांवरून खोट्या बातम्या पसरवून 'मिसिंग लिंक'च्या पुलाबाबत चिखलफेक करणाऱ्या विरोधकांना ??'सुपारीबाज' आणि 'भाटक गदर्भ' (भाडोत्री गाढव) म्हणत प्रतिटोला लगावला. 'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या पुलाला एकही तडा (क्रॅक) गेला नसताना ७ हजार कोटी पाण्यात गेल्याच्या खोट्या बातम्या पेरून महाराष्ट्राचा अपमान केला जात असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मी परवा हिंदीत 'भाडे के टट्टू'हा शब्द प्रयोग केला, तो ज्यांना समजायला हवा होता त्यांना बरोबर समजला. पण काहींना उगाच मिरची लागली. ठीक आहे, मी तो शब्द मागे घेतो आणि त्याऐवजी 'भाटक गदर्भ' हा शब्द वापरतो. कोणाला तरीही समजले नसेल, तर सरळ 'सुपारीबाज' म्हणतो, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे नाव न घेता, ते राजकारणात आहेत याचा आनंद आहे, ते जर मिमिक्री क्षेत्रात गेले असते तर एकाही स्टँडअप कॉमेडियनला मार्केट राहिले नसते, असा टोलाही त्यांनी लगावला.

# राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी घेतली मंत्री नितेश राणे यांची सदिच्छा भेट

### विधानभवनातील दालनात झाली भेट; विविध विषयांवर चर्चा

**मुंबई :**



राज्याचे पोलीस महासंचालक (DGP) सदानंद दाते यांनी आज मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांची त्यांच्या दालनात सदिच्छा भेट घेतली. यावेळी या दोघांमध्ये राज्यातील कायदा व सुव्यवस्था तसेच विविध प्रशासकीय बाबींवर संवाद झाला.

# रत्नागिरी महसूल विभागात खळबळ

### उपजिल्हाधिकारी निशा कांबळे निलंबित तर हर्षलता गेडाम यांच्यावर विभागीय चौकशीचे आदेश

**रत्नागिरी (विशेष प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने रत्नागिरी जिल्ह्यातील प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडवून देणारी मोठी कारवाई केली आहे. कामकाजातील कथित अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर, रत्नागिरी येथे कार्यरत असलेल्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांवर शासनाने कठोर पावले उचलली आहेत. यासंदर्भातील अधिकृत आदेश १० जुलै रोजी जारी करण्यात आले आहेत.

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार, दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांवर

(पान २ वर)

## वेचक

### बेस्ट बसची १४ वाहनांना धडक; ८ जण जखमी

**मुंबई (प्रतिनिधी) :** मुंबईतील अंधेरी पश्चिम परिसरात शुक्रवारी बेस्ट बसचा भीषण अपघात झाला. ब्रेक निकामी झाल्याने बसवरील नियंत्रण सुटून बसने सुमारे १४ वाहनांना धडक दिली. या अपघातात ८ जण जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, अंधेरी पश्चिम येथील एस. व्ही. रोडवरील अंधेरी सबवे परिसरात दुपारी बेस्टच्या मातेश्वरी अर्बन ट्रान्सपोर्ट या (कंत्राटी) बसचा भीषण अपघात झाला.

(पान २ वर)

### आयएसआय हँडलरशी संबंध असलेल्या ११२ जणांची ओळख

**मुंबई:** पाकिस्तानस्थित संशयित आयएसआय हँडलर शहजाद भट्टी याच्याशी सोशल मीडियाद्वारे संपर्कात असलेल्या आणि संशयास्पद कारवायांमध्ये सहभागी असलेल्या ११२ व्यक्तींची महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने ओळख पटवली आहे. शुक्रवारी सकाळी ७ वाजल्यापासून एटीएसच्या १४ युनिट्सद्वारे राज्यभर ही मोठी शोधमोहीम राबवण्यात येत असून, संबंधित व्यक्तींचा शोध घेऊन त्यांची चौकशी केली जात आहे.

(पान २ वर)

# सिंधुदुर्ग जिल्ह्यात लवकरच 'रिव्हर्स मायग्रेशन' सुरू होणार

## सिंधुदुर्ग पालकमंत्री नितेश राणे यांचा विश्वास

### जहाज बांधणीसह मत्स्य-बंदर क्षेत्रात असंख्य प्रकल्प येणार

**मुंबई :**



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ज्या तरुण-तरुणींना नोकरी-धंद्यासाठी मुंबई-पुण्यासह अन्य जिल्ह्यात, राज्यात किंवा परदेशात जावे लागले आहे, त्यांना पुन्हा आपल्या हक्काच्या मातीत परत आणण्यासाठी म्हणजेच जिल्ह्यात 'रिव्हर्स मायग्रेशन' सुरू करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सिंधुदुर्गचा पालकमंत्री म्हणून मी जनतेला दिलेला हा शब्द असून, त्याच मार्गावर चालण्याच्या दृष्टीने टाकलेले हे पहिले मजबूत पाऊल आहे, असा विश्वास राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री

(पान २ वर)

### पुढील पाच वर्षे रोजगार निर्मितीसाठी!

हा तर पहिला टप्पा आहे, अजून असंख्य पर्यावरणपूरक प्रकल्प जहाज बांधणी क्षेत्रात, बंदर क्षेत्रात, मत्स्य व्यवसाय आणि पर्यटन क्षेत्रात आपल्या सिंधुदुर्गामध्ये लवकरच येत आहेत. त्यामुळे पुढील पाच वर्षे आम्ही रोजगार निर्मितीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेणार आहोत. याचे सकारात्मक परिणाम आमच्या सिंधुदुर्गच्या अर्थकारणावर आणि पर्यायाने कोकणावर होणार आहेत, असा विश्वास मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.

# दहिवलीत पुन्हा धोक्याची घंटा; जमिनीला मोठ्या भेगा

### जि.प.सदस्य सचिन धाडवे यांनी केली घटनास्थळाची पाहणी

**राकेश कोळी / खेड :**



खेड तालुक्यातील दहिवली गावावर संकटाचे सावट कायम असून, काही दिवसांपूर्वी झालेल्या भीषण दरड दुर्घटनेत दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर आता गावातील काही ठिकाणी जमिनीला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मुसळधार पावसामुळे संभाव्य भूस्खलनाचा धोका वाढल्याने प्रशासनासह लोकप्रतिनिधीही सतर्क झाले आहेत.

या घटनेची माहिती मिळताच शिवसेना तालुकाप्रमुख तथा रत्नागिरी जिल्हा परिषद सदस्य सचिन धाडवे यांनी तातडीने दहिवली येथे भेट देत भेगा पडलेल्या परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. काही दिवसांपूर्वी याच गावात झालेल्या दरड दुर्घटनेत दोन निष्पाप नागरिकांचा जीव गेल्याची घटना अद्याप ताजी असतानाच पुन्हा निर्माण झालेल्या या धोकादायक परिस्थितीची त्यांनी गांभीर्याने दखल घेतली.

पाहणीदरम्यान धाडवे यांनी जमिनीला पडलेल्या भेगांचे निरीक्षण करून संभाव्य धोके जाणून घेतले. तसेच स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी, भीती आणि सुरक्षिततेबाबत चर्चा केली.

(पान २ वर)

# राम मंदिर दानपेटी अपहार प्रकरणी ३० बँक खाती गोठवली

### शेअर बाजारात गुंतवणुकीचे धागेदोरे

**अयोध्या (प्रतिनिधी) :**

राम मंदिरातील दानपेटीच्या रक्कमेत कथित अपहार केल्याप्रकरणी सुरू असलेल्या तपासात पोलीस यंत्रणेला धक्कादायक माहिती मिळाली आहे. आरोपींनी चोरी केलेली रक्कम केवळ लपवून ठेवली नाही, तर ती शेअर बाजार आणि इतर आर्थिक गुंतवणुकीत वळवल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी आरोपी आणि त्यांच्या नातेवाईकांच्या मालकीची तब्बल ३० बँक खाती गोठवली आहेत.

तपासादरम्यान, मुख्य आरोपी अनुकल्प मिश्रा याने सहआरोपी अविनाश शुक्ला याच्या मदतीने

(पान २ वर)

# रत्नागिरीत ३० खाटांचे अत्याधुनिक 'एकात्मिक आयुष रुग्णालय' मंजूर

### रत्नागिरी जिल्ह्यासाठी १०.५० कोटींचा निधी; एकाच छताखाली मिळणार आयुर्वेद, होमिओपॅथी व इतर उपचार

**रत्नागिरी (वार्ताहर)**

जिल्ह्याच्या आरोग्य सुविधांमध्ये एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी भर पडली आहे. जिल्ह्यासाठी ३० खाटांच्या अत्याधुनिक एकात्मिक आयुष रुग्णालयास (Integrated AYUSH Hospital) राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी रु. १०.५० कोटी (१०५० लाख) इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री डॉ. उदय सामंत आणि आमदार किरण सामंत यांनी या रुग्णालयासाठी राज्य शासनाकडे सातत्याने आणि आग्रही पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आल्याने जिल्ह्यातील आरोग्य क्षेत्रातून आणि नागरिकांमधून या निर्णयाचे जोरदार स्वागत होत आहे.

**उद्यमनगर येथे उभे राहणार रुग्णालय**

महाराष्ट्र शासनाच्या आयुष विभागाने जारी केलेल्या नवीन

(पान २ वर)

# देवरूखात घरफोडी; चोरट्यांनी मारला ऐवजावरती डल्ला?

### शहरात उडाली खळबळ

**देवरूख (प्रतिनिधी)**

संगमेश्वर तालुक्यातील देवरूख शहरातील भरवस्तीतील एक बंगला व एक घर अज्ञात चोरट्यांनी फोडल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली आहे. चोरट्यांनी घरातील ऐवजावर डल्ला मारल्याची चर्चा शहरात सुरू आहे. या घरफोडींच्या घटनेने शहरात मात्र एकच खळबळ उडाली आहे.

देवरूख शहरातील चोरी झालेला बंगला व घर हे बंद होते. या घरांचे मालक बाहेर गेले होते. हीच संधी साधत अज्ञात चोरट्यांनी गुरूवारी रात्री या घरांचे कुलूप तोडत घरात प्रवेश करून घरातील ऐवज लंपास केल्याची शहरात चर्चा आहे.

(पान २ वर)

# जिंद-सोनीपत मार्गावर धावणार देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन



### रेल्वे मंत्रालयाची मंजुरी; हरित क्रांतीचा नवा अध्याय

**नवी दिल्ली :**

भारतीय रेल्वेच्या इतिहासात एक ऐतिहासिक पाऊल उचलले गेले असून, रेल्वे मंत्रालयाने जिंद आणि सोनीपत दरम्यान भारताची पहिली दैनंदिन हायड्रोजन-शक्तीवर चालणारी रेल्वे सेवा सुरू करण्यास औपचारिक मंजुरी दिली आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि स्वच्छ इंधन पर्यायांना चालना देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. ही हायड्रोजन ट्रेन '७४०१०/७४००९' या क्रमांकाने धावणार आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी या ट्रेनला जिंद सिटी, पांदू पिंदारा, ललित खेडा, भांबेवा, ईशापूर खेडी, बुटाणा, खांदराय, गोहाना, राभडा, लाठ, मोहाना, हरियाणा आणि बरवासनी अशा महत्त्वाच्या स्थानकांवर व्यावसायिक थांबे देण्यात आले आहेत.

रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ही ट्रेन लवकरच प्रवासासाठी सज्ज होणार आहे. या ट्रेनमध्ये १२०० किलोवॅट हायड्रोजन फ्युएल सेल प्रोपल्शन सिस्टमचा वापर करण्यात आला आहे. ही हायड्रोजन ट्रेन ताशी ७५ किमी वेगाने धावण्यास सक्षम आहे. हायड्रोजन फ्युएल सेल

(पान २ वर)

# महागडी औषधे आता खिशाला परवडणार

### ३९ औषधांच्या किमती एनपीपीएद्वारे नियंत्रित

**नवी दिल्ली :**

सर्वसामान्य रुग्णांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ऑथॉरिटी'ने ३९ जीवनरक्षक औषधांच्या कमाल किरकोळ किमती निश्चित केल्या आहेत. हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग, एचआयव्ही आणि जिवाणूजन्य संसर्गासारख्या गंभीर आजारांवरील औषधांचा यात समावेश असल्याने, यामुळे रुग्णांवरील उपचारांचा आर्थिक भार लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

'ड्रग्ज (प्राइस कंट्रोल) ऑर्डर, २०१३' अंतर्गत केंद्रीय रसायन आणि खत मंत्रालयाने या दरांची घोषणा केली आहे. हे दर वस्तू आणि सेवा कर वगळून लागू करण्यात आले आहेत. एनपीपीएने स्पष्ट केले आहे की, आता कोणत्याही उत्पादक कंपनीला या निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त दराने औषधांची विक्री करता येणार नाही.

**प्रमुख औषधे आणि त्यांचे नवीन दर**

या यादीत अनेक महागड्या औषधांचा समावेश आहे. हृदयविकाराच्या उपचारात वापरल्या जाणाऱ्या 'टेनेक्टेप्लेस' इंजेक्शनची किंमत ६०,२३८.२७ रुपये प्रति व्हायल निश्चित करण्यात आली आहे. अम्लोडिपिन आणि टेल्मिसार्टन गोळ्यांची किंमत प्रति गोळी १२.०३ रुपये, तर ॲस्पिरिन आणि अटोरवास्टॅटिन कॅप्सूलची

(पान २ वर)

# युद्ध अजून संपलेले नाही...

### इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांचा इराणला इशारा

**तेल अवीव:**




अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविराम मोडल्याने मध्यपूर्वेत पुन्हा एकदा युद्धाचे ढग दाटले आहेत. याच पार्श्वभूमीवर, इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणला थेट आणि आक्रमक इशारा दिला आहे. 'युद्ध अजून संपलेले नाही', अशा शब्दांत नेतान्याहू यांनी इराणला धोक्याची सूचना दिली असून, आपला देश कोणत्याही लष्करी संघर्षासाठी पूर्णपणे सज्ज असल्याचे स्पष्ट केले आहे.

(पान २ वर)

# चिपळूण शहरातील उड्डाण पुलावरून गणेशोत्सवापूर्वी वाहतूक सुरू होणार!

**चिपळूण (प्रतिनिधी) :**



मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणांतर्गत चिपळूण शहरातील बहाद्दूरशेख नाका ते प्रांत कार्यालयापर्यंतच्या उड्डाण पुलाचे काम ९० टक्के पूर्ण झाले असून आगामी दोन महिन्यात उर्वरित काम पूर्ण करून गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या गणेशभक्त चाकरमान्यांसाठी हा पूल खुला व्हावा यासाठी संबंधित ठेकेदार कंपनी व प्रशासन प्रयत्न करीत असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

गेल्या काही वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. चिपळूण विभाग अंतर्गत परशुराम ते खेरशेत या महामार्गादरम्यान चिपळूण शहर व संगमेश्वर बसस्थानकासमोर असे दोन उड्डाण पूल आहेत. यामध्ये चिपळूण शहरातील बहाद्दूरशेख ते प्रांत कार्यालय हा रत्नागिरी जिल्ह्यातील मोठा उड्डाण पूल मानला जात आहे.

चिपळूण शहरांतर्गत येणाऱ्या महामार्गावर बहाद्दूरशेख ते प्रांत कार्यालय या सुमारे दोन किलोमीटर अंतरावर रस्त्याच्या दुतर्फा व्यावसायिक व रहिवासी संकुल असल्याने येथे उड्डाणपूल व्हावा या मागणीची दखल घेऊन या मार्गावर उड्डाणपूल मंजूर करण्यात आला व रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीला पुलाचे काम देण्यात आले होते. काम सुरू होऊन दोन ते तीन गर्डर चढवण्यात आले आणि काम सुरू असतानाच गर्डर कोसळले. शासनाने तत्काळ दखल घेऊन पुलाचा संपूर्ण आराखडा रद्द करून नवीन पुलाचा आराखडा तयार करण्यात आला व कामाला नव्याने सुरुवात करण्यात आली. तब्बल ९५ पिलर असलेला १८०० मीटर लांबी आणि ४५ मीटर रुंदी असलेला

(पान २ वर)

# अनिल अंबानी समूहाच्या कर्ज घोटाळ्याचा तपास वेगात

**मुंबई (प्रतिनिधी):**

रिलायन्स अनिल अंबानी समूहाशी संबंधित बनावट (शेल) कंपन्यांना राष्ट्रीयीकृत बँकांकडून मोठ्या प्रमाणावर कॉर्पोरेट कर्जे कशी मंजूर करण्यात आली, याचा तपास आता सक्तवसुली संचालनालय करत आहे. रिलायन्स होम फायनान्स आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स मधील १५ हजार ५४८ कोटी रुपयांच्या कथित अपहार

(पान २ वर)